# नागपुरात 'छात्र पोलिस' उपक्रमाचा पोलिस आयुक्तांनी केला श्रीगणेश



**विशेष प्रतिनिधी/ ४ जानेवारी**

**नागपूर :** 'दहशतवाद' हा देशासमोर सर्वात मोठ्ठा प्रश्न- पोलिस आयुक्त डॉ. भूषण कुमार उपाध्याय युवा वर्ग जातो आहे अमलीय पदार्थाच्या आहारी वेळेवर त्यांना मार्गदर्शन अत्यंत गरजेचे नागपुर प्रतिनिधि-रामदेव बाबा इंजीनियरिंग एन्ड मैनेजमेंट कॉलेज गिट्टीखदान नागपुर बुधवार येथे 'छात्र पोलिस' या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचा शुभारंभ कार्यक्रम करण्यात आला. मुख्य म्हणजे पोलिस आयुक्त डॉ. श्री भूषण कुमार उपाध्याय यांच्या संकल्पनेतूनच 'छात्र पोलिस' हा सूंदर असा उपक्रम आहे जो विद्यार्थ्यांसाठी, नवयुवकांसाठी सगळ्या शाला व महाविद्यालयात जोमाने राबविण्यात येणार आहे .

अगोदर फक्त अशिक्षित तसेच विशिष्ट वर्गातिल काही लोकच गुन्हेगारी च्या मार्गात वळत असायचा असा गैर समज प्रत्येकांच्या मनाचा सहज समज असायचा पण आज परिस्थिति विकट आहे ,विपरीत सुद्धा आहे आणि तेही चिंताजनक सध्याच्या परिस्थितिनुसार उच्चवर्ग ,उच्चशिक्षित लोक सुद्धा गुन्हेगारी कड़े वळतांना ,त्यात लिप्त असतांना सुद्धा निदर्शनात आले आहे। याशिवाय वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे अपघातांच्या प्रमाणात अधिकाधिक वाढ होत आहे. शाळा ,महाविद्यालयातिल येथील विद्यार्थी ड्रग्स,अमली पदार्थांच्या आहारी जाउंन अधिकाधिक व्यसनाधीन होत चाललेली आहे ही मोठ्ठी चिंतेची बाब आहे.

दहशतवाद हा आपल्या देशा समोर सर्वात मोठ्ठा गंभीर प्रश्न असून त्या बाबद एक जवाबदार नागरिक म्हणून शालेय स्तरा पासुनच विद्यार्थ्यांना त्याचे दुष्परिणामाची जाणीव करून देऊन त्याबाबद अधिकाधिक जनजागृती उपाययोजना निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहे अशी माहिती नागपुरचे पोलिसआायुक्त डॉ भूषण कुमार उपाध्याय यांनी दिली. ते पुढे म्हणाले की उपक्रमाअंतर्गत नागपुर शहरातिल सर्व शाळा, महा विद्यालये यांचा सुद्धा समावेश करण्यात आलेला आहे. सर्वप्रथम रामदेव बाबा इंजीनियरिंग एंड मैनेजमेंट कॉलेज नागपुर याची सुरवात येथून त्या करिता कॉलेज प्रशासनाचे आम्ही आहोत. 'छात्र पोलिस बाबत अधिक मार्ग दर्शन करतांना ते म्हणाले की सदर उपक्रमान्तर्गत नागपुर शहरातील सर्व पोलिस ठान्यातील एक पोलिस अधिकारी हा महिन्यातुन किमान दोनदा शाळा , महाविद्यालयाचे प्राचार्य यांना भेट देऊन त्यांच्या शाळेतील किंवा महा विद्यालयातील समस्या विचारुन त्या आधारे तेथील विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करतील.

त्या मध्ये विद्यार्थ्यांना सर्व विषयांवरील जनजागृति या वीडियो क्लिपच्या माध्यमातून दाखविन्यात येईल तसेच त्यांना गुन्हे व त्यांचे आपल्या जीवनावर होणारे परिणाम, वाहतुक, दहशतवाद तसेच अमली पदार्थ विरोधी बाबद सुद्धा मार्गदर्शन करून त्यांच्यामधे एक सजग नागरिक बनविण्याकरीता जागरूकता निर्माण करण्यात येईल पोलिस अधिकार्यामार्फत स्पर्धा परिक्षेत,नोकरी संदर्भात सुद्धा मार्गदर्शन करण्यात येईल. छात्र पोलिस ही संकल्पना प्रत्येक नागरिकांसाठी आहे सर्व सभ्य नागरिक हा साध्या वेशातिल पोलिसच असतो जो व्यक्ति सतर्क,सजग,असतो तो पोलिस असतो प्रत्येक नागरिकांनी स्वत:ला कायदयाची शिस्त आणि नियमांचे पालन केले पाहिजे त्याकरिता विद्यार्थी असतांनाच मुलांना शैक्षणिक शिक्षणासोबच सामाजिक दृष्टया सर्वमुल्य शिक्षण देणे फार गरजेचे आहे.

त्या करिता पोलिस व विधार्थी यांच्यात जास्तीत जास्त संवाद होने फार गरजेचे आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात पोलिस बाबत असणारी भीतिही नाहिशी होऊन येणाऱ्या समस्या सहज सुटतील एख़ादी घटना घडल्यानंतर त्यावर उपाय योजना करण्यापेक्षा ती भविष्यात घडूच नये या करिता वेळीच प्रतिबंध उपाय योजना आखली पाहिजे.

पोलिसांनी नियमित शाळा ,महाविद्यालय यांच्या भेटी होत असल्याने आस पासच्या अप्रवृत्तिचे लोक तसेच इतर असामाजिक तत्व सुद्धा नाहीसे होण्यास मदत होईल सदर उपक्रम राबवितांना येणाऱ्या अडचणी व इतर समस्यांचे कालानुरूप बदल व निराकरण करता येईल असे ते म्हणाले या कार्यक्रमाच्या प्रसंगी मा.श्री पोलिस आयुक्त डॉ.भूषण कुमार उपाध्याय नागपुर ,मा.श्री.गोविंद अग्रवाल ,मा.राजेन्द्र पुरोहित मा.श्री राजेश पांडे प्राचार्य रामदेव बाबा इंजीनियरिंग कॉलेज ,श्री कोकाटे ,श्री चंदू पेंड़के ,मा. सह पोलिस आयुक्त श्री रविन्द्र कदम,मा.अपर पोलिस आयुक्त श्री बी.जी.गायकर ,यांची प्रमुख उपस्थिती होती.

याकार्यक्रमाला नागपुर शहरातील सर्व पोलिस उपायुक्त, सहा.पोलिस आयुक्त,वरिष्ट पोलिस निरिक्षक इतर पोलिस अधिकारी व कर्मचारी देखील उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना मा.पोलिस उपायुक्त श्री राहुल माकनिकर परी क्र-३ यांनी केली व या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मा.पोलिस आयुक्त श्री संभाजी कदम यांनी केले या नंतर सर्व उपस्थीतांनी राष्ट्रगीत म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली कार्यक्रमाला रामदेव बाबा इंजीनियरिंग कॉलेज विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने आवार्जुन उपस्थित होते.

पान १ वरुन...

### मनोरुग्ण वकील चंद्रशेखर शिंदे याला अटक करून वेड्याच्या इस्पितळात रवानगी करण्यासाठी नागरिकांची मागणी

अधीक्षक अब्दुल रहमान यांचे भ्रष्टाचार उघडकीस आणले.

आरोपी विक्षिप्त वकील चंद्रशेखर शिंदे हा त्यावेळी संघटनेत काम करीत होता. त्याने संघटनेच्या नावाचा दुरुपयोग करून संघटनेच्या कार्यालयात चोरी, अफरातफर आदी गैरप्रकार केले. तसेच संघटनेच्या दिनांक २० ऑक्टोबर २००७ च्या यवतमाळ येथील कार्यक्रमात अनुसूचित जातीचे सरकारी वकील श्री. थूल यांना का बोलावले म्हणून त्याने कार्यक्रमात गोंधळ घातला व त्यावरून त्याची जातीय मानसिकता सिद्ध झाल्यामुळे व त्यांचे विक्षिप्त, वेडसर वागणे या सर्व कारणांमुळे संघटनेने त्यांची हकालपट्टी केली.

विक्षिप्त वकील शिंदे याने संघटनेवर चिडून आणि देशद्रोही अब्दुल रहमान यांच्याशी जवळीक केली. त्यानंतर दोघांनी संगनमताने कट रचून मानवाधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. निलेश ओझा आणि राष्ट्रीय सचिव रशीद खान पठाण यांच्या विरुद्ध खोट्या तक्रारी व खोटे प्रस्ताव बनविणे सुरू केले

ट ा र ं त ा ु

त्यांचा खोटेपणा फार काळ टिकला नाही.

पोलीस महासंचालक यांच्या चौकशीत अब्दुर रहमान देशद्रोही असून त्यांनी यवतमाळ येथील जातीय दंगली घडवून आणल्यात आणि वेश्या महिलांची त्या पैशाची दलाली करतात.

राजकीय नेत्यांना कॉलगर्ल पुरवितात असा अहवाल सादर केला. त्या अहवालाच्या आधारावर रशीद खान पठाण यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन (write petition) दाखल करून अब्दुर रहमान विरुद्ध फौजदारी कारवाई करून प्रकरणाचा तपास सी.बी.आय.कडे देण्याची मागणी केली असून उच्च न्यायालयाने दिनांक २०.०४.२०१७ रोजी WP ३१८ /२०१३ मध्ये आरोपी अब्दुर रहमान यास नोटीस जारी करून जाब विचारला आहे. त्यामुळे घाबरून जाऊन आरोपी अब्दुर रहमान यांनी मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम. ए. सईद त्यांच्यामार्फत कट रचून दि. १२ एप्रिल २०१७ रोजी नऊ वर्षांपूर्वीच्या खारीज झालेल्या प्रकरणात खोडतोड व रेकॉर्ड मध्ये बदल करून बेकायदेशीर आदेश पारित केले की, बार कौन्सिलने यासंदर्भात कारवाई करावी व पोलीस महासंचालक यांनी त्या केसमध्ये लक्ष घालावे. सईद याचे आदेश पारित करते वेळी त्यांनी ज्या मुद्यावर त्यांनी पोलीस आयुक्त अमरावती यांना आदेश दिला कि त्यांच्या चार वर्षे आधीच त्यांच्या सर्व मुद्द्यांवर आधारित गुन्हा क्र.१९१/२०१० हा पुसद पोलिसांनी नोंद करून तपास करून अहवाल पुसद न्यायालयात दाखल केला होता. तसेच त्या केसमध्ये फिर्यादी अँड. मेघराज धुळे यांनी स्वत: न्यायालयात शपथपत्र देऊन चुकीने तक्रार दाखल केल्याचे मान्य केले होते.

त्याबाबत प्रकरण पुसद न्यायालयात दोष मुक्ती आदेशासाठी प्रलंबित आहे. त्या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचा आरोपी चंद्रशेखर शिंदे यांचा अर्ज प्रधान जिल्हा न्यायाधीश यवतमाळ यांनी फेटाळला आहे. एम.ए.सईद यांच्या आदेशाविरुध्द रशीद खान पठाण यांनी मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी याचिका क्रमांक १९९८ / २०१७ दाखल करून आरोपी शिंदे अब्दुल रहमान, एम.ए. सईद विरुद्ध फौजदारी कारवाई मार्फत चौकशी व दहा कोटी रुपये नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

तसेच चंद्रशेखर शिंदे यांनी जे इतर गुन्हे प्रलंबित आहे अशी माहिती दिली होती ते गुन्हे उच्च न्यायालय व सत्र न्यायालयाकडून खारीज करण्यात आले होते तरीसुद्धा त्या आदेशाचा अवमान करून ते गुन्हे प्रलंबित आहे असे नमूद करून बेकायदेशीर आदेश एम.ए.सईद यांनी दिले.

तसेच एम.ए.सईद यांनी बार कौन्सिलला जे प्रकरण दिले त्या प्रकरणाचा वकील व्यवसायाशी काहीही संबंध नव्हता व अशा प्रकरणात बार कौन्सिलला प्रकरण देता चालविता येणार नाही असा स्पष्ट कायदा सर्वोच्च न्यायालयाने कौशल अवस्थी (२०१८)१३ S १९५ या प्रकरणात ठरवून दिला आहे त्यामुळे मानवी हक्क आयोगाचे दिनांक १२.०४.२०१७ चे आदेश बेकायदेशीर रद्दबातल ठरले असून सुद्धा पुन्हा त्याचा आदेशावर आधारित अर्ज करणे हा कोर्ट अवमान कायद्याअंतर्गत गंभीर गुन्हा असून या प्रकरणात मानवी हक्क आयोगाचे सदस्य आरोपी असून या प्रकरणात मानवी हक्काचे सदस्य एम.ए.सईद यांना न्यायमूर्ती करणन प्रमाणे सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते व त्यांच्या गैरकायदेशीर कृत्यास मदत करणारे सर्व सहआरोपी होऊ शकतात.

तसेच खोटी किंवा अर्धवट माहितीच्या आधारे पारित केलेले आदेश हे पदाचा दुरुपयोग (Fraud on power) या प्रकरणात मोडत असून असे सर्व आदेश खारीज व रद्दबातल समजण्यात यावे असा स्पष्ट कायदा सर्वोच्च न्यायालयाने सतलज जल विद्युत निगम २०१८ SCC online SC १६३६ या प्रकरणात करून दिला आहे तसेच जर एखाद्या प्रकरणात एकदा गुन्हा नोंद होऊन तपास झाला असेल तर त्याच मुद्द्यावर पुन्हा तपास करता येणार नाही ते भारतीय राज्यघटनेचे उल्लंघन ठरते असा स्पष्ट कायदा सर्वोच्च न्यायालयाने T.T. Antony AIR २००१ SC २६३७ आणि Babubhai's Case (२०१०) १२ SCC २५४ या प्रकरणात ठरवून दिला आहे. त्या आदेशाविरुद्ध जाणून नव्याने तपास देण्याचा अधिकार मानवी हक्क आयोगाला नाही असा कायदा मुंबई उच्च न्यायालयाने २०१८ All MR (CRI) २८१३ नुसार ठरवून दिला आहे. परंतु एम.ए.सईद यांना कायद्याचे योग्य ज्ञान नसल्यामुळे व त्यांची गुन्हेगारी मानसिकता सिद्ध झाल्यामुळे त्यांना त्वरित बडतर्फ करावे. अशी मागणी अँड. विवेक रामटेके यांनी केली आहे. याव्यतिरिक्त मानवी हक्क आयोगाने त्यांचे पत्र जा.क्र.MSHRC/LEGAL/ ७१० दि.३१.०५.२०१२ नुसार मानव अधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय सचिव रशीद खान पठाण यांना पत्र पाठवून ते आयोगाकडे नागरिकांच्या वतीने तक्रारी पाठवू शकतात असे कळविले आहे. रशीद खान यांना मानवाधिकाराचे काम करण्याचा अधिकार नाही तरीसुद्धा असे बेताल आरोप मनोरुग्ण शिंदेने केले आहेत. या सर्व मुद्द्यावर आधारित फौजदार रिट पिटीशन क्रमांक १९९८/२०१७ ही मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली असून त्या याचिकेमध्ये आरोपी चंद्रशेखर शिंदे अब्दुर रहमान आणि सईद यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करून प्रकरणाचा तपास सी.बी.आय.कडे देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत याचिकेची प्रत व कायदेशीर नोटीस आरोपी चंद्रशेखर शिंदे, एम.ए.सईद त्यांच्यावर तामिल करण्यात आली आहे. परंतु ही बाब लपवून शिंदे यांनी पुन्हा दि. ०३ डिसेंबर २०१८ रोजी त्याच मुद्द्यावर एक खोटी व बेकायदेशीर तक्रार दिल्यामुळे त्यांच्या विरुद्ध भा.दं.वि. १९१, १९२, १९३, १८८, १९९, २००,४७१, ४६९, ४७४ सोबत १२०(B) ,३४ अंतर्गत कार्यवाही करण्याची मागणी करण्यात येत आहे. तसेच शिंदे यांचे दिनांक ०३ डिसेंबर २०१८ च्या तक्रारीत त्यांनी अनुसूचित जातीचे मा.खासदार विजय खडसे यांच्याविरुद्ध खोटे आरोप केल्यामुळे शिंदे विरुद्ध अ‍ॅट्रासिटी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करून त्यांना त्वरित अटक करून त्यांची रवानगी वेड्यांच्या इस्पितळात करावी अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान बचाव वकील परिषदेचे अध्यक्ष अँड. विवेक रामटेके यांनी केली आहे.

### कमिशन मिळालं नाही म्हणून काँग्रेसने राफेलचं डील केलं नाही : निर्मला सीतारमन

असे सीतारमन म्हणाल्या. २०१४ पर्यंत तुम्हाला १८ विमानही खरेदी आली नाहीत. का तुम्ही खरेदी करु शकला नाहीत? असा सवाल सीतारमन यांनी केला. यावर्षाच्या सप्टेंबर महिन्यात पहिले राफेल विमान हवाई दलाला मिळेल त्यानंतर २०२२ पर्यंत अन्य ३५ विमाने हवाई दलाच्या ताफ्यात दाखल होतील. पहिले विमान २०१९ ला आणि शेवटचे राफेल २०२२ ला मिळेल.

### मारवाडी एकेकाळी गरिबांची पिळवणूव....

आज तेच मारवाडी समाज बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने पुरस्कार देत आहे. हे सकारात्मक चिन्हे असल्याचे मत सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केले. यूजीसीचे माजी अध्यक्ष डॉ सुखदेव थोरात यांना सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार देण्यात आले. आज बाबासाहेबांचे विचार संपवण्याचे प्रयत्न होत आहे. त्यामुळे अनुसूचित समाजाने सावध राहण्याची गरज असल्याचे मत शिंदे यांनी व्यक्त केले. एखादे राजकीय लाभ घेण्यासाठी, एखादी सीट मिळवण्यासाठी बाबासाहेबांच्या विचारांशी तडजोड करणे योग्य नाही, असेही शिंदे म्हणाले.

पान ८ वरुन...

### पंतप्रधानपद म्हणजे मुंगेरीलालची स्वप्नं....

समर्थन करणारे फलक लावण्यात आल्याविषयी त्यांनी प्रतिक्रिया दिली.

अमेठी दौऱ्यावर असणाऱ्या इराणी ही पोस्टरबाजी पाहून म्हणाल्या, 'राहुल गांधी यांना महायुतीत अशा प्रकारचा (पंतप्रधान बनण्याचा) आशीर्वाद ना मायावती यांनी दिला आहे, ना अखिलेश यांनी दिला आहे आणि ना ममता बॅनर्जी यांनी दिला आहे. त्यामुळे त्यांना ही मुंगेरीलालची स्वप्न पाहण्यापासून कोणीच रोखलेलं नाही.'

छत्तीसगढ, मध्य प्रदेश, राजस्थान येथे काँग्रेसच्या वाट्याला यश आल्यानंतर अमेठीमध्ये त्यांच्या नावाचे पोस्टर झळकल्याचं पाहायला मिळालं. आगामी निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर केलेल्या दौऱ्यात इराणी यांनी याच पोस्टरबाजीविषयी बोचरी टीका केली. त्यामुळे आता 'मुंगेरीलालची स्वप्न....', असा उल्लेख करत राहुल गांधी यांना टोला लगावणाऱ्या इराणी यांना काँग्रेसकडून काही उत्तर मिळणार का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### लग्नाच्या काही दिवस आधी तरुणीचे अपहरण करुन सामूहिक बलात्कार

प्रयत्न केला असे पीडित मुलीने तिच्या कुटुंबियांना सांगितले. तिच्या हातावर आणि डोक्यावर भाजल्याच्या खुणा आहेत. तिन्ही आरोपी गावातून फरार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. एक आरोपी ४२ वर्षांचा असून तो गावामध्ये शाळा चालवतो. दुसऱ्या आरोपीचा केबलचा व्यवसाय आहे तर तिसऱ्याची ओळख अद्याप पटलेली नाही.

### पॅसेंजर बंद झाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणीत वाढ

वाहनांनी यावे लागते. तेथून बसगाड्यांनी प्रवास करावा लागतो.

या प्रकाराने विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींनाही सामोरे जावे लागत आहे. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ठरावीक शुल्क आकारुन पास दिली जाते. पण, आता रेल्वेगाड्याच बंद असल्याने आणि बसफेऱ्यांची सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी निर्माण होत आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रवास करताना खर्च करावा लागत आहे. पण, हा प्रकार शेतकऱ्यांच्या पाल्यांकरीता दुष्काळात तेरावा महिनाच ठरत आहे.

### गोमांस खाणे सोडल्याने जागतिक मृत्यूदर कमी होईल, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे मत

स्कूलने हा अभ्यास केला होता. विविध फळभाज्यांतील बिया,

मटार आणि मायक्रोप्रोटिन यांच्यात अधिक प्रमाणात निरोगी आरोग्यासाठी आवश्यक घटक असतात.

गोमांस खाणे सोडल्याने लोकांचे आरोग्य सुधारेल. त्याचबरोबर पर्यावरण रक्षणही शक्य होईल. सध्या जगात जेवढे मृत्यू होताहेत. त्याला गोमांस सेवन हे सुद्धा एक कारण आहे. जर गोमांस खाणे बंद केले गेले. तर जागतिक स्तरावर २.४ टक्क्यांनी मृत्यूचे प्रमाण कमी होईल. श्रीमंत देशांमध्ये गोमांस खाण्याचे प्रमाण जास्त असल्याने तिथे जर का याचे सेवन कमी केले गेले, तर त्या देशांमध्ये ५ टक्क्यांपर्यंत मृत्यूचे प्रमाण कमी होईल. गोमांस खाण्यापेक्षा इतर ज्या पदार्थांमध्ये प्रथिनांचे प्रमाण जास्त आहे, त्यांचे सेवन करणे सर्वांच्याच फायद्याचे आहे. त्यामुळे मृत्यूचे प्रमाणही कमी होईल, असे जागतिक आर्थिक परिषदेने म्हटले आहे.

या अभ्यासामध्ये गोमांस खाल्ल्याने किती जणांचा मृत्यू झाला, अशी कोणतीही आकडेवारी दिलेली नाही. त्याचबरोबर गोमांस खाल्ल्याने कोणता आजार होतो, याबद्दलही काही माहिती देण्यात आलेली नाही. पण श्रीमंत देशांमध्येच गोमांस मोठ्या प्रमाणात खाल्ले जात असल्याने त्याने ते सोडावे, अशी मागणी केली जात आहे. टाइम्स ऑफ इंडियामध्ये या संदर्भातील वृत्त प्रसिद्ध झाले आहे.

२०५० साली जगाची लोकसंख्या १० अब्जापेक्षा जास्त होईल. त्यामुळे जागतिक स्तरावर गोमांस खाण्याचे प्रमाणही आणखी वाढेल. त्यावेळी ग्राहकांची गोमांसची मागणी पूर्ण करणे शक्य होणार नाही, असे जागतिक आर्थिक परिषदेचे व्यवस्थापकीय संचालक डॉमिनिक वाघ्रे यांनी सांगितले.

### लोकमंगलची खाती गोठवण्याची नोटीस, सुभाष देशमुखांच्या अडचणीत वाढ

संस्था अस्तित्वात नसल्याचे दिसून आले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचं खोटे समंतीपत्र दिले. बनावट अकृषीक प्रमाणपत्रही देण्यात आले आहे. बांधकाम विभागाचे बनावट प्रमाणपत्र आणि कारखाना नोंदणीचं बनावट प्रमाणपत्र सादर करण्यात आले. त्यामुळे हा सर्व बनाव असल्याचे दिसून येत आहे.

बोगस प्रस्ताव सादर करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी, सरकार लोकमंगलवर मेहरबानी दाखवत असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. लोकमंगल वैध कागदपत्रांसह पुन्हा प्रस्ताव दाखल करू शकते, अशी खास सूट देत सरकारने या संस्थेवर मेहरनजर दाखवली होती. त्यावर आता आक्षेप घेण्यात येत असून, सहकारमंत्री सुभाष देशमुखांसह लोकमंगलच्या संचालकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे.

# सेवाग्राम पोलिस स्टेशनला अजूनही जाग नाही



**प्रतिनिधी / ०४ जानेवारी**

**वर्धा :** आशिष अनंतराव थुल यांचेवर क्षुल्लक कारणास्तव दि. ३१ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजताचे सुमारास निखील ब्राम्हणकर, सत्यजीत गडपायले व अन्य १२ साथीदारांनी अचानक हल्ला करुन चाकूने जवळपास ६ ते ७ घाव मारुन गंभीर जखमी केले. आशिष अनंतराव थुल हे सेवाग्राम हॉस्पीटल येथे आय.सी.यु.विभागात गंभीर अवस्थेत भरती आहे. याबाबत सेवाग्राम पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला असता सदर गुन्ह्यामध्ये गैरअर्जदारावर साधारण भा.दं.वि. ३२४ कलम लावण्यात आली आहे. सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने त्यांचेवर कलम ३०७ चा गुन्हा दाखल करुन तात्काळ अटक करावी अशी विनंती केली असता संबंधित पोलिस अधिकाऱ्याने आज दिनांकापर्यंत आरोपींना अटक केलेली आहे.

गैरअर्जदार हे अपराधीक वृत्तीचे असून त्यानंतर त्यांनी अनेक वेळा अर्जदाराला धमक्या देण्याचे कार्य सुरु आहे. त्यामुळे अर्जदाराचे कुटुंब भयभित अवस्थेत आहे. गुन्हेगारांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी जनक्रांती सेना वर्धा जिल्ह्याचे जिल्हाअध्यक्ष रोशन ठाकुर यांनी यापूर्वीच पोलिस अधिक्षक यांना निवेदन दिले. परंतू अजून कारवाई न झाल्याने जिल्हाधिकारी, वर्धा यांना आज पुन:श्च कारवाई होणेसाठी निवेदन दिले. निवेदन देताना रोशन ठाकुर जिल्हाध्यक्ष, पवन चंबुलकर उपजिल्हाध्यक्ष, राहुल इंगळे जिल्हा संघटक, रोहन हाडोळे वर्धा शहर उपाध्यक्ष, नितीन वाघ तालुका अध्यक्ष, नावेद शेख जिल्हाध्यक्ष विद्यार्थी सेना, गजेंद्र ठाकुर, वैभव भुरे, गौरव रायपुरे, मिथून मोहिते, रोहीत डहाके, प्रतिक डहाके, शोहेब खान, हर्षल देशमुख, अजिंक्य रामटेके, साहिल खान, निखील धनविज, सागर कसनाके, प्रविण मेश्राम, सुरज थुल, रजत नाकले, धिरज थुल, रितेश नगराळे, सनी उरकुडे, सुगत थुल, कुणाल कुंभारे, महेश ब्राम्हणे, अमित पठाण, विनोदसिंग इत्यादी उपस्थित होते.

# वैजापुरात पुन्हा कांदा रस्त्यावर

**विशेष प्रतिनिधी / ०४ जानेवारी**

**वैजापूर:** कांदा उत्पादकांना सरकाने दिलासा देत क्विंटलमागे २०० रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला असला तरी त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नाही. कांद्याचे दर घसरलेलेच असून बुधवारी वैजापुरात एका शेतकऱ्याच्या कांद्याला बाजारपेठेत अवघा ५२ रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला. त्यामुळे उत्पादक शेतकऱ्याने कांदा रस्त्यावर फेकून आपला संताप व्यक्त केला.

दरम्यान, वैजापुरातील मुख्य रस्त्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात कांदा फेकल्यामुळे जवळपास शंभर ते दीडशे कार्यकर्त्यांनी संबंधित शेतकऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली. या प्रकारामुळे वैजापुरात तीन ते चार तास तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

कांद्याचे दर मागील काही दिवसांपासून गडगडलेले असल्यामुळे राज्य सरकारने २० डिसेंबर रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल २०० रुपयांचे अनुदान देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०१८ या कालावधीत नवी मुंबई वगळता इतर ठिकाणच्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये विक्री झालेल्या सुमारे ७५ लाख क्विंटल कांद्यासाठी हे अनुदान दिले जाणार असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सुमारे ४० हजार रुपयांपर्यंतची ही मदत मिळणार आहे. त्यापोटी सरकारवर सुमारे दीडशे कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र कांद्याचे दर अजूनही गडगडलेल्या स्थितीतच असून बुधवारी वैजापूरजवळील चांडगाव येथील प्रमोद गायकवाड या शेतकऱ्याने आपला ३० क्विंटल कांदा बाजार समितीत विक्रीसाठी आणलेला होता. त्या कांद्यासाठी शेतकऱ्याला ५२ रुपये प्रतिक्विंटलचा भाव मिळाला.

**कार्यकर्ते आक्रमक**

वैजापुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातच मुख्य रस्त्यावर कांदा फेकल्यामुळे काही कार्यकर्त्यांनीही संताप व्यक्त केला.

